पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १६६
सभावृत्तांत

दिनांक - २७.०४.२०१० वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २७.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
४. मा.सुमनताई मधुकर पवळे
५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७. मा.थोरात एकनाथ दादा
८. मा.तानाजी विठ्ठल खाडे
९. मा.गावडे जयश्री वसंत

याशिवाय मा.मुंढे - सहा.आयुक्त,मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.धाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.लोंढे - मुख्यलेखापाल,मा.सावळे - अति.अधिक्षक अभियंता,मा.सुरगुडे - विकास अभियंता,मा.चव्हाण - अति.शहर अभियंता,मा.पाटील - उपसंचालक,नगररचना, मा.कुदळे, मा.पठाण - कार्य.अभियंता, मा.पोमण - संगणक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

राजस्थानच्या राज्यपाल व कॉंग्रेसच्या जेष्ठ नेत्या प्रभा राव यांचे तसेच पिंपरी येथील सामाजिक कार्यकर्ते वसंत बाबुराव वाघेरे व बाळासाहेब बबन वाघेरे यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस श्रध्दांजली वाहून मंगळवार दिनांक ४/५/२०१० रोजी दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- मंगळवार दिनांक ४/०५/२०१० रोजी दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६६

सभावृत्तांत
(दि.२७.०४.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक - ४.०५.२०१० वेळ - दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२७.०४.२०१० ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ४.०५.२०१० रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.जगदीश शंकर शेट्टी
३. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
६. मा.सुमनताई मधुकर पवळे
७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.गावडे जयश्री वसंत
१२.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी
१३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.सावंत, मा.गायकवाड, मा.गावडे, मा.झुरे - सहा.आयुक्त,मा.धाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.काळे-नगरसचिव,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर - वैद्यकिय संचालक, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.कांबळे,मा.जाधव, मा.कपिले,मा.कुदळे, मा.थोरात,मा.ढगे,मा.बनकर,मा.चव्हाण, मा.निकम मा.दुधेकर, मा.चिंचवडे, मा.पाटील - कार्य.अभियंता, मा.साळुंके-मुख्यउद्यान अधिक्षक,मा.पोमण - संगणक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

मा.वर्षा मडिगेरी :- मा.स्थायी समिती सभा दिनांक २२.४.२०१० ठराव क्र.१०९५७ मध्ये - "मान्यता देणेत येत आहे" या मजकुरानंतर "अनुकुल : १३ प्रतिकुल : १ " हा मजकुर तसेच "सर्वानुमते" या मजकुराऐवजी "बहुमताने" हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २२.४.२०१० ठराव क्र.१०९५७ मध्ये -"मान्यता देणेत येत आहे"या मजकुरानंतर "अनुकुल : १३ प्रतिकुल : १ " हा मजकुर तसेच "सर्वानुमते" या मजकुराऐवजी "बहुमताने" हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्त्यांसह दिनांक १३.४.२०१०, २०.४.२०१० व २२.४.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- ११०३८ विषय क्रमांक :- १
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - भौगोलिक सुचना प्रणाली कक्ष
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जीआयएस/११/कावि/९७/२०१०
दि.०३/०३/२०१०
विषय :- GISDA Application ची देखभाल व दुरुस्तीबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०३९ विषय क्रमांक :- २
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - प्रशासन
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४५६/२०१०
दि.१३/०४/२०१०
विषय :- श्री.अजय सुर्यवंशी यांना कायदा सल्लागार पदावर मानधनावर नियुक्ती देणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४० विषय क्रमांक :- ३
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - वायसीएमएच
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/५अ/कावि/७२/२०१० दि.१३/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रूग्णालयासाठी नव्याने आकारण्यात येणारे सी.आर. एक्स-रे चे शुल्क तसेच रक्तामधील तपासणीचे शुल्का बाबतचा प्रपत्र अ क्ष-किरण विभाग व प्रपत्र ब प्रयोगशाळा विभाग यांचे शुल्क तक्ता प्रस्तावा सोबत जोडलेला असून सदर दराच्या आकारणीस माहे एप्रिल २०१० पासून दर लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४१ विषय क्रमांक :- ४
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.जयश्री गावडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जस/१/कावि/१४२/२०१० दि.१५/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वतीने महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दि.११/४/२०१० ते १४/४/२०१० या कालावधीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सदर कालावधीत दररोज विविध सांस्कृतिक कार्यक्रम, तज्ञ मान्यवरांच्या व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली असल्याने त्यासाठी मानधन, चहापान, बॅनर, भोजन व्यवस्था, स्मृतिचिन्हे, रांगोळी इ.साठी र.रू.११,५५,०००/- [र.रू.अकरा लाख पंचावन्न हजार] अपेक्षित असल्याने दि.११/४/२०१० ते १४/४/२०१० या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवास थेट पध्दतीने येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४२ विषय क्रमांक :- ५
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - उद्यान
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/नि/१/६४/२०१० दि.१७/०४/२०१०
विषय :- नि.नो.क्र.९/१ - ०९ - १० मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरीबाबत..

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४३ विषय क्रमांक :- ६
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - उद्यान
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/नि/१/६५/२०१०
दि.१७/०४/२०१०
विषय :- नि.नो.क्र.९/२ - ०९ - १० मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरीबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४४ विषय क्रमांक :- ७
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - संगणक
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/९/कावि/४५८/२०१०
दि.१६/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

संगणक विभागातील Hp Designjet ५०० Plotter चे Carriage Motor बदलने व Plotter दुरुस्ती करणे कामीची तातडीची गरज विचारात घेता निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने कामकाज करून घेणे आवश्यक असून सदरचे Hp Designjet ५०० Plotter, १ नग मे.Quicksoft Services Pune-४३ यांचेकडून दुरुस्ती करणेस व येणाऱ्या र.रू.९,५००/- [र.रू.नऊ हजार पाचशे] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४५ विषय क्रमांक :- ८
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - अग्निशामक
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अग्नि/०१/कावि/१२४/२०१०
दि.१६/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.१४ ते २० एप्रिल, २०१० पर्यंत अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन कामी र.रू.२०,०००/- [र.रू.वीस हजार] खर्च अपेक्षित असल्याने सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४६ विषय क्रमांक :- ९
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - नगरसचिव
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:-मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/०१/कावि/४०२/२०१०
दि.१७/०४/२०१०

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४७ विषय क्रमांक :- १०
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/०१/कावि/३९/२०१०
दि.२१/०४/२०१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.४.२०१० ते ११.४.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३९/२०१० दि.२१.४.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४८ विषय क्रमांक :- ११
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/०१/कावि/४०/२०१०
दि.२१/०४/२०१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.४.२०१० ते १८.४.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४०/२०१० दि.२१.४.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०४९ विषय क्रमांक :- १२
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जयश्री गावडे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/०१/कावि/४१/२०१०
दि.२१/०४/२०१०

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील मार्च २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०५० विषय क्रमांक :- १३
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/१५५/२०१०
दि.२१/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी यांचेकडून माध्यमिक शिक्षण विभागासाठी २८५ मीटर पडदे मा.सहा.आयुक्त, जनता संपर्क केबिन मध्ये पडदे २० र.मीटर, व मनपाचे माणिक कॉलनी मधील व्यायामशाळेत मॅट १२०० चौ.फुट व पडदे, ८० र.मीटर तसेच मनपाचे रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात खिडक्या व दरवाज्यांसाठी आवश्यक ३२६.५५ र.मी.प्रमाणे एकूण र.रू.१,४७,६४७/- येणार असल्याने पडदे व मॅट खरेदीकामी मे.स्टार फॅब्रिक्स, निगडी यांचे बरोबर मंजूर निविदा दराने वाढीव करारनामा करण्यास व येणाऱ्या एकूण र.रू.१,४७,६४७/- [र.रू.एक लाख सत्तेचाळीस हजार सहाशे सत्तेचाळीस] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०५१ विषय क्रमांक :- १४
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - संगणक
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/८/कावि/१५६/२०१०
दि.२१/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.६/३/२०१० पासून पुढील तीन महिने कालावधीसाठी बांधकाम परवानगी विभागाकडील Auto ACR software Dedicated Server वर जागा आरक्षित करणे, Unlimited Bandwidth उपलब्ध करणे व Web hosting बाबतचे कामकाज करणे इ.कामकाज मागील वर्षी कामकाज केलेल्या दराने प्रतिमहिना र.रू.१८,०००/- याप्रमाणे तीन महिने कालावधीचे र.रू.५४,०००/- इतक्या रकमेस मे.Tech 9 Services यांचेमार्फत करणे आवश्यक असल्याने त्यास आणि सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ११०५२ विषय क्रमांक :- १५
दिनांक- ४.०५.२०१० विभाग - प्रशासन
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४८०/२०१०
दि.२२/०४/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सध्या खातेनिहाय चौकशीची प्रलंबित प्रकरणे विचारात घेता, श्री.शां.वि.दरेकर यांना खातेनिहाय चौकशी अधिकारी या पदावर मुदतवाढ देणे आवश्यक असलेने तसेच शासन निर्णय दि.२८/१०/२००९ नुसार विभागीय चौकशी प्रकरणांमध्ये १ अपचारी गुंतलेला असलेस र.रू.८,०००/- व एकापेक्षा अधिक अपचारी गुंतलेले असलेस प्रत्येक जादा अपचाऱ्यामागे र.रू. १०००/- इतके वाढीव मानधन अदा करून दि.१६/४/२०१० पासून १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास, तसेच नोव्हेंबर २००९ पासून सादर केलेल्या एकूण १० प्रकरणांमधील राहिलेले एकूण र.रू.३०,०००/- [र.रू.तीस हजार] वाढीव मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/५८८/२०१० सही/-
दिनांक - ५/०५/२०१० चे लगत नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.